# नबीरा महाविद्‍यालय, काटोल

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम अहवाल

# 2018 - 2019

# राष्ट्रीय सेवा योजना

# नबीरा महाविद्यालय,काटोल

# अहवाल

# 2018 - 2019

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे 2018-2019 या सत्रामध्ये नबीरा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाला 100 स्वयंसेवकांची मंजुरी मिळाली. नोंदणी नंतर निवड झालेल्या सर्व स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्देशा बाबत व उपक्रमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक 17/07/2018 ला नबीरा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून काटोल शहरात 'वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन जागृकता' कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी N.S.S. स्वयंसेवकांव्दारे काटोल शहरातील श्रीराम नगर, पंचवटी भागात वृक्षरोपण करण्यात आले.या जागृकता अभियानाच्या यशस्वी आयोजनामध्ये वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. एस.ए. सोनेगावकर,प्रा.डॉ.आर.जी.गोंगले,प्रा.डॉ.पुनित राऊत,प्रा. जयंत कळंभे,प्रा. उमेश निसवादे, प्रा.सौरभ ढोरे,N.S.S. कार्यक्रम अधिकारी प्रा.मुकेश जाधव व N.S.S. स्वयंसेवक सहभागी होते.





**वृक्षरोपण करतांना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी प्रा. मुकेश जाधव, प्रा. डॉ. आर. जी. गोंगले**



**वृक्षारोपण करतांना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक**

अनेकदा वृक्षरोपण केल्यानंतर त्यांच्या संगोपनाची काळजी घेतांना दिसत नाही त्यामुळे वृक्षरोपण कार्यक्रमांची सांगता यशस्वी होत नाही. याच दृष्टीकोनातून स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व दिवसाला दिनांक 14/08/2018 ला नबीरा महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना,न.म.वि. व्दारे'वृक्ष संवर्धन अभियान' राबविण्यात आले.या अभियाना अंतर्गत वृक्ष सद्दढ व निकोप करण्यासाठी N.S.S. स्वयंसेवकांकडून महाविद्यालयातील वृक्षांना रंग रंगोटी, आळे करून पाणी देण्यात आले. स्वयंसेवकांनी या विषयाच्या बाबत त्यांच्याकडे असणाऱ्या कल्पनांचे आदान- प्रदान केले.





**महाविद्यालयातील वृक्षांना रंगरंगोटी करतांना स्वयंसेवक व प्राध्यापक**

दिनांक 02/10/2018 लामहात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत N.S.S. च्या सर्व स्वयंसेवकांनी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता व सुशोभीकरण करून या अभियानात कार्यशील सहभाग नोंदविला.




**महाविद्यालय परिसर, वर्गखोल्यांची स्वच्छता करतांना स्वयंसेवक**

काटोल शहरातील नवरात्री महोत्सव पंचक्रोशीत प्रसिध्द आहे.हा महोत्सव पाहण्यासाठी हजारो भाविक काटोल शहरात येत असतात.त्या भाविकांना दिनांक 16 /10/2018 ला राष्ट्रीय सेवा योजना,न.म.वि. व्दारे 'महाप्रसाद आणि पाणी वितरण'करण्यात आले. महोत्सवात येणाऱ्या भाविकांना सामाजिक प्रश्नाबाबत संदेश देणे आणि त्यांच्यामध्ये जागृकता निर्माण करणे या मुख्य उद्देशासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.त्यासाठी स्वयंसेवकांनी सामाजिक संदेशाचे प्रदर्शन केले. या प्रसंगी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा.निरंजनजी राऊत,प्रा.डॉ.आर.जी.गोंगले, प्रा.डॉ.पुनित राऊत,प्रा.संदीप जोगेवार ,प्रा.सौरभ ढोरे,प्रा. जयंत कळंभे, N.S.S. कार्यक्रम अधिकारी प्रा.मुकेश जाधव उपस्थित होते.




**महाप्रसाद पाणी वितरण आणि सामाजिक संदेश प्रसारण कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व प्राध्यापक**

**राष्ट्रीय सेवा योजना, नबीरा महाविद्यालय,काटोल व्दारा '26 नोव्हेंबर - संविधान दिवस' साजरा**

राष्ट्रीय सेवा योजना, नबीरा महाविद्यालय,काटोल व्दारा 26 नोव्हेंबर - 'संविधान दिवस' या निमित्ताने दिनांक 26 नोव्हेंबर 2018 ला 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरवातीला संविधान उद्देश पत्रिकेचे (प्रस्तावना ) वाचन व प्रास्ताविक N.S.S. कार्यक्रम अधिकारी प्रा.मुकेश जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला

प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.जयंत कळंभे यांनी विध्यार्थ्यांना ‘भारतीय राज्यघटना, भारतीय नागरिक -अधिकार व हक्क’ या विषयावर मार्गदर्शन केले. कायर्क्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रा. डॉ. आर. जी. गोंगले हे होते.





**संविधान उद्देशपत्रीकेचे ( प्रस्तावनेचे ) वाचन करतांना कार्यक्रम अधिकारी प्रा. मुकेश जाधव, प्रा. डॉ. आर. जी. गोंगले ,प्रा. जयंत कळंभे व स्वयंसेवक**

नबीरा महाविद्यालयाच्या N.S.Sआणि N.C.C या दोन्ही विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 05/01/2019 रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी रक्तदान करून ‘रक्तदान हेच श्रेष्ठ दान’ या सुविचाराची आचरणातून जोपासना केली. रक्तदान शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. टी.एल.जगदळे, प्रा.परेश देशमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मुकेश जाधव तसेच N.S.S व N.C.C चे स्वयंसेवकांनी सहकार्य केले.






**रक्तदान करतांना स्वयंसेवक**

समाजातून हत्तीरोगाचे निर्मुलन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडून दिनांक 20/01/2019 ते 25/01/2019 या कालावधीत ‘हत्तीरोग दूरीकरण मोहीम’ राबविण्यात आली. या मोहिमेत राष्ट्रीय सेवा विभागाच्या 45 स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेवून काटोल शहरात हि मोहीम यशस्वी केली.स्वयंसेवकांनी काटोल शहराच्या विविध भागात जावूनहत्तीरोगाचे लक्षणे आणि परिणाम प्रभावीपणे सांगून नागरिकांशी संवाद

साधला त्याचबरोबर हत्तीरोग निर्मूलनाच्या औषध गोळ्याचे वाटप करून नागरिकांना ती औषधे घेण्यासाठी प्रवृत्त केले.हत्तीरोग दूरीकरण मोहिमेसाठी नबीरा महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. आर. आर. धोटे तसेच ग्रामीण रुग्णालय काटोलचे डॉ. नरेंद्र एस. डोमके, श्री. एच. ए. राउत यांचे विशेष सहकार्य लाभले.





**हत्तीरोग निर्मुलन अभियान औषधी व गोळ्यांचे वाटप तसेच प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी**





अरविंद बाबू देशमुख महाविद्यालय, भारसिंगी व्दारे दिनांक 28/01/2019 ते 03/02/2019 या कालावधीत चिंतामुनीश्वर टेकडी, पारडसिंगा, ता- काटोल येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ स्तरीय शिबिरात राष्ट्रीय सेवा योजना, न.म.वि. चे दोन स्वयंसेवक सहभागी झाले होते. या स्वयंसेवकांनी युवकांमधील व्यसनधिनता या सामाजिक प्रश्नाचे गांभीर्य, जल आणि जमीन संवर्धनाचे महत्व तसेच शिबिरात त्यांना आलेले अनुभव इतर स्वयंसेवकांना कथन करून 'व्यसनधिनता' आणि 'दुष्काळ' या सामाजिक प्रश्नाबाबत जाणीव महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली.

राष्ट्रीय सेवा योजना, न.म.वि. तील स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून शैक्षणिक सत्र 2018-19 मध्ये राबविलेल्या विविध कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग नोंदवून आपला सर्वांगिण विकास राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करण्याचा सात्यत्यपूर्ण प्रयत्न केलेला आहे.

धन्यवाद!

दिनांक - 09 / 04 / 2019

प्रा. मुकेश जाधव,

कार्यक्रम अधिकारी

कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना,
नबीरा महाविद्यालय,काटोल.

Principal
Nabira Mahavidyalaya,
Katol, Dist. Nagpur.